




Title Code- MAHMAR-51647

# दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784
Email- jansanchlan@gmail.com








वर्ष २ रे | अंक : ६८८. वा | शुक्रवार | दि. २३ फेब्रुवारी २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये


# नव्याने रुजू झालेले एसडीओ तरी भ्रष्टाचाऱ्यांवर कारवाई करणार का?

## बुलढाणा महसूल विभागात भ्रष्टाचाराची गाठली चरम सीमा...




**जनसंचलन/ बुलढाणा**

येथील महसूल विभागात बोकाळलेल्या भ्रष्टाचारासंबंधी सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन सातत्याने पाठपुरावा करीत आहे, परंतु अद्यापपर्यंत महसूल विभागील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या भ्रष्टाचाराकडे सातत्याने डोळेझाक केल्याचे दिसून येते आहे. या स्थितीत आता नव्याने उपविभागीय अधिकारी म्हणून शरद पाटील बुलढाण्यात रुजू झालेले आहेत. जुन्या उपविभागीय अधिकाऱ्यांनी जी चूक केली, ती नव्याने रुजू झालेल्या उपविभागीय अधिकाऱ्यांनी न करता भ्रष्टाचार प्रकरणी योग्य ती कायदेशीर कारवाई करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. बुलढाण्याच्या महसूल विभागात आज अनेक भ्रष्टाचाऱ्यांचा बोलबाला असल्याचे दिसून येत आहे. या ठिकाणी दिवसाढवळ्या रोजरोसपणे भ्रष्टाचार होतो आहे. महसूल विभागात भ्रष्टाचार करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्याऐवजी त्यांना वर्षानुवर्षे सातत्याने संरक्षण दिले जात आहे. पर्यायाने या ठिकाणी भ्रष्टाचार कमी होण्याऐवजी प्रचंड वाढतच चालला आहे. शिवाय भ्रष्टाचारी अधिकारी हे मस्तवालपणे कामकाज रेटत आहेत. बुलढाणा महसूल विभागात अनेक वर्षांपासून काम करणारे भ्रष्टाचाराचे शिरोमणी व भ्रष्टाचाराचे अनेक विक्रम मोडणारे बहुचर्चित मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे हे आज महसूल विभागातील भ्रष्टाचाराचे आयडॉल बनले आहेत. विजय दत्तात्रय टेकाळे यांनी एव्हढा निर्लज्जपणे आणि बिनदिक्कतपणे भ्रष्टचार केला आहे की, देशातील कोणताही मोठ्यात मोठा भ्रष्टाचारी टेकाळेंचा भ्रष्टाचार पाहून लाजल्याशिवाय राहणार नाही. विजय टेकाळे यांनी अनेक पातळ्यांवर भ्रष्टाचार करून स्वतःच्या तुंबड्या भरल्या आहेत. या भ्रष्टाचारातून स्वतःच्या व नातेवाईकांच्या नाव-वार प्रचंड प्रमाणात स्थावर संपत्ती जमवली आहे. आज सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनकडे टेकाळे व त्यांच्या निकटच्या नातेवाईकांच्या नावावर शेकडोंच्या संख्येने जमिनीचे सातबारा उतारे आ-हेत. हा सर्व पैसा भ्रष्टाचारातून कमावत टेकाळेंनी नियमबाह्य संपत्ती जमवण्याचा महाप्रताप केला आहे. बरं टेकाळे हे भ्रष्टाचार करीत आहेत किंवा कुणाचेही ऐकत नाही, हे ठीक आहे. परंतु मग या भ्रष्टाचार प्रकरणी व अवैध संपत्ती जमवल्या प्रकरणी जर योग्य कारवाई झाली असती, तर भ्रष्टाचाराला व अवैध संपत्तीला लगाम बसला असता. परंतु टेकाळे यांच्यावर कोणतीही कारवाई आजवर झालेली नाही. यातून हे स्पष्ट आहे की, टेकाळे यांना महसूल विभागातील वरिष्ठ अधिकारी टेकाळेंच्या भ्रष्टाचाराला अभय देत आहेत. टेकाळे यांच्यासारख्या महाभ्रष्टाचाऱ्याला अभय दोनच कारणांमधून मिळू शकते. एक तर महसूलचे वरिष्ठ अधिकारी अत्यंत निष्क्रिय, नेभळट तसेच ढिसाळ कारभार करणारे असतील किंवा अधिकारीच भ्रष्ट असतील. या दोनच स्थितीत कारवाई होण्याची शक्यता नाही. त्यामुळे आता महसूलचे अधिकारी हे महाढिसाळ आहेत की महाभ्रष्टाचारी हे तर महसूल प्रशासनानेच ठरवले पाहिजे. टेकाळे यांना सातत्याने अभय मिळाल्यामुळे त्यांनी आपल्या भ्रष्टाचाराला शिष्टाचाराचे स्वरूप देऊन टाकले आणि दिवसरात्र अगदी बिनदिक्कतपणे भ्रष्टाचार सुरू ठेवला. त्यांची भ्रष्टाचाराची ही महान परंपरा आजही राजरोसपणे सुरू आहे. बुलढाण्याचे तत्कालीन तहसीलदार रुपेश खंडारे या महाभागाने तर उघडपणे टेकाळेंच्या भ्रष्टाचारात त्यांची साथ दिली. त्यामुळे त्यांच्याकडून भ्रष्टाचार प्रकरणी कारवाईची अपेक्षाच नव्हती. दुसरे होते ते मावळते उपविभागीय अधिकारी राजेंद्र जाधव. यांच्याकडेही टेकाळेंच्या भ्रष्टाचाराची कागदपत्रे, पुरावे देण्यात आले होते. परंतु राजेंद्र जाधव यांनी कागदपत्रांचा अभ्यास करण्यात अनेक महिने टाईमपास केला. आता जाधव हे भ्रष्टाचारी आहेत की, ते टेकाळेंवर कारवाई करण्यास घाबरत होते, हे आम्हास अजिबात ज्ञात नाही, परंतु टेकाळेंवर त्यांनी कारवाई केली नाही, हे सूर्यप्रकाशाएव्हढे सत्य आहे. पर्यायाने आता नव्याने आलेले उपविभागीय अधिकारी शरद पाटील यांच्याकडून या प्रकरणी मोठ्या कारवाईची अपेक्षा आहे. शरद पाटील हे आएएस कॅडरचे असून, अत्यंत कर्तव्यदक्ष असल्याचे त्यांच्याबाबत माहिती सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनला प्राप्त झाली आहे. त्यामुळे शरद पाटील यांच्याकडून भ्रष्टाचाऱ्यांवर मोठ्या कारवाईची अपेक्षा आहे. महसूल विभागात बोकाळलेल्या या भ्रष्टाचाराला त्यांनी संपवण्यासाठी आता पुढाकार घेणे गरजेचे आहे, अशी अपेक्षा अनेकांनी सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनजवळ व्यक्त केली. जोपर्यंत नवे उपविभागीय अधिकारी हे भ्रष्टाचाऱ्यांवर कारवाई करीत नाही, तोपर्यंत दैनिक जनसंचलनची मोहीम अविरतपणे सुरू राहणार आहे.

अजून बरेच काही पुढील भागात...

---

# देऊळगाव महीत ट्रकच्या धडकेत दुचाकीस्वार ठार

**जनसंचलन/ देऊळगाव मही**

भरधाव वेगातील ट्रकने दुचाकीस धडक दिल्याने धोत्रा नंदाई येथील एकाचा जालना येथील रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. हा अपघात २१ फेब्रुवारी रोजी रात्री साडेसात वाजेच्या सुमारास देऊळगाव मही येथील बाजार समितीजवळ घडला. पवन शिवहरी केदार (२५, रा. धोत्रा नंदई) असे अपघातामध्ये ठार झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. देऊळगाव मही येथून आपले काम आटोपून पवन शिवहरी केदार हा एमएच-२८-झेड-२१०८ क्रमांकाच्या दुचाकीवर धोत्रा नंदईकडे २१ फेब्रुवारी रोजी रात्री साडेसात वाजेच्या सुमारास निघाला होता. दरम्यान देऊळगाव मही येथील बाजार समितीच्या गेटमधून एमएच-२३- डब्लू ६०८२ क्रमांकाच्या ट्रक चालकाने त्याचा ट्रक भरधाव वेगात चालवून पवन शिवहरी केदार याच्या दुचाकीला जबर धडक दिली. त्यात तो गंभीर जखमी झाला. त्याला तातडीने देऊळगाव मही येथील ग्रामीण रुग्णालयात हलविण्यात आले. त्याची प्रकृती गंभीर असल्याने प्रथमोपचार करून त्यास जालना येथे पुढील उपचारासाठी हलविण्यात आले. परंतु तेथे उपचारादरम्यान त्याची प्राणज्योत मालावली. याप्रकरणी शिवानंद बाबूराव मुंढे (रा. धोत्रा नंदी) यांनी दिलेल्या तक्रारीवरून ट्रक चालकाविरोधात देऊळगाव राजा पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेचा पुढील तपास पोलिस निरीक्षक संतोष महल्ले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस हेड कॉन्स्टेबल कलीम देशमुख हे करती आहेत. दरम्यान गेल्या १४ फेब्रुवारी रोजी पवनचा साक्षगंध झाला होता. मात्र काळाने अचानक त्याच्यावर झडप घातली. त्यामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.




दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# गोतमारा येथील रंधा मनिशनवर वनविभागाची धडक कारवाई...

## दोन अटक, एक फरार:६ लाखाचा मुद्देमाल जप्त





**जनसंचलन/बुलडाणा**

अवैध लाकुड मालाच्या नावाखाली अवैध लाकुड मालाची विक्री होत असल्याची गुप्त माहितीवरून वनविभागाच्या पथकाने मोताळा तालुक्यातील गोतमारा या गावातील एका रंधा मशीनवर धडक कारवाई करीत लाकुड मालाची तपासणी करून यामध्ये वैध लाकुड मालसह सागवन लाकडावर बंदी असुन सुध्दा येथे हे आढळून आल्याने कारवाई करीत यामध्ये एक रंधा मशिनसह दोन जणांना अटक करण्यात आले असून त्यांना बुलडाणा येथील वनविभागाच्या कार्यालयात आणले आहे. तर एक फरार आहे. याबाबत मिळालेली माहिती अशी की, गोतमारा या गावात रंधा मशिन चालु असून येथे वैध लाकुड मालाच्या नावाखाली खुलेआमपणे सागवन या मौल्यवान झाडाची अवैधरित्या वृक्ष तोड करून परिसरातील जंगलातील वनसंपत्ती दिवसेंदिवस नष्ट होत आहे, यावर प्रतिबंध करण्यासाठी वनविभागाने पथक तयार केले. दरम्यान त्यांना मिळालेल्या गुप्त माहितीवरून त्यांनी गोतमारा येथील एका रंधा मशिनवर धडक कारवाई केली. या कारवाईत वैध लाकुड मालासह सागवन या मौल्यवान लाकुडही जप्त करण्यात आले. यामध्ये एकुण अंदाजे ६ लाख रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. बुलडाणा येथील वनविभाग मुख्यालय येथे कारवाईत जप्त करण्यात आलेले माल जमा केले आहे. पुढील कारवाई वनविभाग करीत आहे.

# महासंस्कृती महोत्सवात लोक कलेचा जागर दंडार, गोंधळाला नागरिकांची पसंती हास्य कवी संमेलनात विडंबनाला दाद...

## लावणीवर धरला ठेका...

**जनसंचलन/बुलढाणा**

महासंस्कृती महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी आज ङ्गजागर लोक कलेचाफ कार्यक्रमात पारंपरिक दंडार, भारुड, गोंधळ, पोवाडा, वासुदेव या लोककला सादर करण्यात आल्या. तसेच महाराष्ट्रातील नामांकीत कवींचे हास्यकवी संमेलन पार पडले. दीप्ती आहेर आणि समूहानी पारंपरिक लावणी सादर केली. यावेळी आमदार श्वेता महाले, जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी सदाशिव शेलार, उपजिल्हाधिकारी शरद पाटील आदी उपस्थित होते. सांस्कृतिक परंपरांचे आदान-प्रदान व्हावे यासाठी पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग आणि जिल्हाधिकारी कार्यालयातर्फे चिखली येथे आयोजित महासंस्कृती महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी जागर लोक कलेचाफ कार्यक्रम सादर करण्यात आला. यात बुलडाणा येथील अंध निवासी शाळेच्या विद्यार्थ्यांनी गीत सादर केले. नंदकिशोर यांच्या समूदाने गोंधळ सादर केला. गणेश कदम यांनी वासुदेव, शाहिर हरिदास खाडेभराड यांनी शेतकरी आत्महत्या, प्रमोद दांडगे





यांनी भारूड, पांडुरंग ढिलावी समूह यांनी दंडार, मेहकर येथील आई लोककला यांनी गोंधळ सादर केला. हास्य कवी संमेलनात स्वाती सुरंगळीकर, अनिल दीक्षित, भालचंद्र कोळपकर, वृशाली देशपांडे, बंडा जोशी यांनी सहभागी होत हास्य कविता सादर केल्या. बंडा जोशी यांनी याड लागलं हे विडंबन सादर केले. भालचंद्र कोळपकर यांनी बायकोवर कविता सादर केली. स्वाती सुरंगळीकर यांनी मुलाच लग्नातील किस्सा सांगितला. अनिल दीक्षित यांनी नोटबंदीवर कविता सादर केली. दीप्ती आहेर आणि समूहानी सुरवातीला गौळण सादर केली. त्यानंतर माधवी यांनी या रावजी बसा भावजी आणि दीप्ती आहेर यांनी हा साजन माझा लावणी सादर केली. कामिनी पुणेकर यांनी कुणी तरी न्या हो मला फिरवायला या गाण्यावर लावणी सादर केली. कार्यक्रमस्थळी बचतगटांच्या स्टॉल्सच्या माध्यमातून खाद्य संस्कृतीचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच हस्तकला आणि पारंपरिक वस्त्रांचे दालन आणि पुस्तके विक्रीस ठेवण्यात आली आहे. महासंस्कृती महोत्सवात शेवटच्या दिवशी उद्या गुरुवार, दि. २२ फेब्रुवारी रोजी महाराष्ट्राची लोकधाराफ या महाराष्ट्राची संस्कृती दर्शविणारा कला आविष्कार अनिरुद्ध जोशी आणि सहकलाकार सादर करतील. तसेच गौरी थोरात ह्या राजमाता जिजाऊसाहेब यांच्या जीवनावर आधारित एकांकिका सादर करतील. महासंस्कृती महोत्सवात नागरिकांनी विनामूल्य प्रवेश आहे. नागरिकांनी सांस्कृतिक आणि लोककलांचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.


# सकल माळी समाज चिंतन शिबीर संपन्न बारा बलुतेदार व सर्व अलुतेदारांना सोबत घेऊन ओबीसीच्या न्याय हक्कासाठी लढणार...

**जनसंचलन/बुलडाणा**

सकळ माळी समाज चिंतन शिबिर राजीव गांधी सैनिकी शाळा बुलढाणा येथे संपन्न झाले. समाजाच्या असलेल्या शैक्षणिक, सामाजिक व राजकीय समस्यांच्या बाबतीत या शिबिरामध्ये चर्चा करण्यात आली सध्याच्या परिस्थितीमध्ये समाजात अनेक आव्हाने असून त्या आव्हानांना कसे सामोरे जावे याबाबतीत समाजातील मान्यवर लोकांनी मार्गदर्शन केले.विशेषतः ओबीसी आरक्षणाच्या संदर्भात काढण्यात आलेल्या अध्यादेशाबद्दल माळी समाजासह इतर ओबीसी समाजामध्ये असलेल्या संभ्रमाबद्दल त्यांनी आपली मते व्यक्त केली. तसेच माळी समाजाने ओबीसी आरक्षण वाचवण्यासाठी पुढाकार घेऊन व इतर समाजाला सोबत घेऊन जिल्हाभरात जागृती निर्माण करावी असा सूर व्यक्त करण्यात आला.तसेच समाजची राजकीय प्रगती होणे ही काळाची गरज असून येत्या लोकसभा निवडणूकित समाजाला उमेदवारी मिळवीण्याचे प्रयत्न करण्यात यावे आणि मोठया संख्येनं असलेल्या माळी समाजास कुठल्याही पक्षाने उमेदवारी दिली नाही तर माळी समाज व सम्पूर्ण ओबीसी समाज मिळून एकजुटीने ताकदीनीशी समाजाचा उमेदवार उभा करावा व निवडून आणावा असाही विचार या चिंतन शिबिरात व्यक्त करण्यात आला व त्यास सकल माळी समाजाने पाठिंबा व्यक्त केला. या चिंतन शिबिरात काही ठराव पारित करण्यात आले. ओबीसीच्या न्याय



हक्कासाठी संघर्ष करणारे नामदार छगनरावजी भुजबळ साहेब यांच्या अभिनंदनाचा ठराव एकमुखाने पारित करण्यात आला. ओबीसीची जनजागृती करण्यासाठी ओबीसी चेतना यात्रा काढण्याबाबत ठराव घेण्यात आला. त्याच प्रमाणे लोकसभेत व विधानसभेत ओबीसीच्या हक्कासाठी संघर्ष करणारा व ओबीसीचा आवाज बनणाऱ्या उमेदवारस प्राधान्याने मतदान करा असाही ठराव घेण्यात आला. तसेच गावागावात क्रांतीसूर्य महात्मा जोतीराव फुले यांची जयंती मोठया प्रमाणात उत्साहपुर्ण वातावरणात साजरी करणे, त्याचप्रमाणे ओबीसीतील लहान घटक जसेकी बारा बलुतेदार व सर्व अलुतेदार यांना सोबत घेऊन सामाजिक व राजकीय न्यायासाठी संघर्ष करणे अशे अनेक ठराव सर्वानुमते पारित करण्यात आले.



या सभेच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार कृष्णराव इंगळे हे होते तसेच स्वागताध्यक्ष म्हणून राजीव गांधी मिलिटरी स्कूलचे अध्यक्ष विश्वनाथ माळी हे होते या सभेसाठी सिदखेडराजा येथून छगनराव मेहेत्रे चिखली येथून समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ खरात, मा पंचायत समिती सभापती परशराम बोराडे,दलित मित्र माधवराव हुडेकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या चिंतन शिबिराचे आयोजन प्राध्यापक सदानंद माळी यांनी केले होते तर शिबिराचे प्रास्ताविक सिंदखेड राजा चे मा नगरध्यक्ष छगन दादा मेहेत्रे .यांनी केले. सदर शिबिराचे सूत्रसंचालन.. प्रा सदानंद माळी यांनी केले ..तर आभारप्रदर्शन..इंजिनीर सुरेश चौधरी यांनी केले.

The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




# बुलडाणा शहरात विश्वाचे निर्माते भगवान श्री विश्वकर्मा यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी

जनसंचलन/बुलढाणा

सृष्टीचे निर्माते भगवान विश्वकर्मा यांची जयंती आज दि २२ फेब्रुवारी २०२४ रोजी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली आहे. ही जयंती श्री सद्गुरु दामोदर महाराज मंदिर भगीरथ कारखान्याजवळ चिखली रोड येथे साजरी करण्यात आली आहे. भगवान विश्वकर्मा देवांचे वास्तुकला तज्ञ आहेत. त्यांनी भगवान श्रीकृष्णासाठी द्वारका,पांडवासाठी हस्तिनापूर व रावणासाठी सोन्याची लंका तयार केली. या नगरांच्या रचनेत, सौंदर्य, अचुकता व सुखसोयी यांचा मिलाप होता. ते वास्तुशास्त्राचे पहिले प्रणेते आहेत. विविध कार्यक्रमाने जयंती ची सुरुवात करण्यात आलेली आहे. सर्वप्रथम ज.न.म प्रवचनकार नाणीजधाम राजू



महाराज सनान्से यांच्या प्रवचना पासून सुरुवात करण्यात आली. त्यांनी सांगितले की जोपर्यंत आपल्यातला अहंकार जात नाही तोपर्यंत परमेश्वराची प्राप्ती होणार नाही परमेश्वराची प्राप्ती व्हावी असे वाटत असेल तर देवासारखे वागणे शिकले. परोपकार दया क्षमा अंगी बाळगा. तुम्ही जगा आणि दुसऱ्याला जगवा स्वप्नात सुद्धा कोणाचे वाईट चीतू नका मग परमेश्वर हा संभव आपल्याला मदत करेल असे मार्गदर्शन यावेळी त्यांनी आपल्या प्रवचनांमधून दिले आहे. त्यानंतर भगवान श्री



विश्वकर्मा यांच्या प्रतिमेचे पूजन करून सर्व समाज बांधवांच्या वतीने आरती करण्यात आली. व नंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात आले आहे. सुतार समाज बांधव तसेच महिला मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होते.

# गद्दारांना ५० खोक्यांचा भाव मिळाला ; मात्र, शेतकऱ्यांना हमीभाव नाही - उद्धव ठाकरे यांची जनसंवाद मेळाव्यात घणाघाती टीका





जनसंचलन/ चिखली

भाजप आणि मिंधे सरकारच्या राजवटीत गद्दारांना ५० खोक्यांचा हमीभाव मिळाला. मात्र, चोहीबाजूने संकटाच्या चक्रव्युहात अडकलेल्या कष्टकरी शेतकऱ्यांच्या मालाला भाव नाही. त्यांना केंद्रातील मोदी तर राज्यातील मिंधे सरकारने वाऱ्यावर सोडले आहे, अशी घणाघाती टीका शिवसेना (उबाठा) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आज राजा टॉवर येथील आयोजित जनसंवाद मेळाव्यात केली. पुढे होऊ घातलेल्या लोकसभा निवडणुकीत हुकूमशाहीकडे वाटचाल करणाऱ्या मोदी सरकारला पायउतार करून गद्दारांना पराभूत करून जमिनीत गाडा, असे आवाहनही त्यांनी यावेळी उपस्थित जनसमुदायाला संबोधित करताना केले. आजपासून बुलडाणा जिल्हा दोन दिवसीय दौऱ्यावर आलेल्या उद्धव ठाकरेंची पहिली सभा आज गुरुवारी २२ फेब्रुवारी चिखली येथे पार पडली. यावेळी बोलताना ठाकरे यांनी बंडखोर व भाजपवर टीकेचा आसूड उगारला. राजा टॉवर येथे रणरणत्या उन्हात पार पडलेल्या या सभेला सेना नेते खासदार संजय राऊत, अरविंद सावंत, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्यासह भास्करराव मोरे, उपजिल्हा प्रमुख कपिल खेडेकर, युवासेना जिल्हा प्रमुख नंदु कराडे , तालुका प्रमुख किसन धोंडगे, शहर प्रमुख श्रीराम झोरे, शिवसैनिक बहुसंख्येने हजर होते. यावेळी ठाकरे यांनी गद्दारांना लक्ष्य केले. शिवसैनिक व जनतेच्या ताकदीने मोठी झालेले, गद्दारी करून तिकडे गेले. त्यांना ५० खोके लखलाभ होवो, पण त्यांना आता जनतेची साथ, आशीर्वाद लाभणार नाही, हे नक्की आहे. त्यांनी आमचा धनुष्य चोरला, पक्ष चोरण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. मात्र, काहीही केले तरी त्यांच्या कपाळावरील गद्दारीचा काळाकुट्ट डाग पुसला जाणार नाही. येणाऱ्या निवडणुकीत जनता जनार्दन त्यांना त्यांची जागा दाखविणार ही काळ्या दगडावरची रेष आहे. माझा नरेंद्र मोदींना वैयक्तिक विरोध नाही, तर त्यांच्या हुकूमशाहीला अन एकाधिकारशाहीला विरोध आहे. त्यामुळे यंदाची लोकसभा निवडणूक ही या हुकूमशाही विरुद्ध आहे. त्यामुळे यंदाची निवडणूक ही मतदारांची देखील कसोटी पाहणारी ठरली आहे. हुकूमशाही हवी की लोकशाही? याचा सारासार विचार करून मतदान करण्याची वेळ आता येऊन ठेपली आहे. उत्तरेकडील हजारो शेतकरी पुन्हा दिल्लीच्या सीमेवर आले आहे. निडरपणे आंदोलन करीत आहे. गोळीबार, अश्रुधुर असे केंद्राचे अन्याय सहन करीत ते आंदोलन व आपल्या मागण्यांवर ठाम आहे. मात्र, महाराष्ट्रातील शेतकरी अन्याय सहन करत शांत आहे. बुलढाण्यातही असेच चित्र आहे. जिजाऊंच्या बुलडाणा जिल्ह्याचा अन शिवरायांच्या महाराष्ट्राचा स्वाभिमान गेला तरी कुठे? असा उद्विग्न सवाल ठाकरेंनी यावेळी केला.

# तीन दिवसीय जिल्हास्तरीय भौतिकी उपकरण कार्यशाळा संपन्न !

जनसंचलन/नांदुरा



नांदुरा (रेल्वे). श्री शिवाजी शिक्षण द्वारा संचालित श्री पुंडलिक महाराज महाविद्यालय नांदुरा रेल्वे येथे भौतिक शास्त्रीय विभागात जिल्हास्तरीय तीन दिवसीय भौतिकी उपकरण तयार करण्याची कार्यशाळा संपन्न झाली आहे. कार्यशाळेला अध्यक्ष म्हणून सन्माननीय प्राचार्य डॉ. दिलीप हांडे हे होते. या कार्यशाळेला प्रमुख वक्ते आणि विषय तज्ञ म्हणून आलेले डॉ. सोमेश वद्राबाडे होते. कार्यशाळेचे संयोजक म्हणून विभाग प्रमुख प्रा. डॉ. सचिन मुखमाले होते. कार्यशाळेला सूत्रसंचालन करणारे विज्ञान महाविद्यालयाचे प्रा. राहुल निकम यांनी प्रास्ताविक केले तर कार्यशाळेचे आभार प्रदर्शन प्राध्यापक राहुल पाटील सर यांनी केले. या तीन दिवसीय जिल्हास्तरीय भौतिकी उपकरण कार्यशाळाला २०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. कार्यशाळा ही प्राचार्य डॉ. दिलीप हांडे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना भौतिकशास्त्र विभागांमध्ये प्रयोगशाळेचे प्रात्यक्षिक करत असताना विद्यार्थ्यांना जो आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी जे प्लॅटफॉर्म उपलब्ध करून दिले व विषय तज्ञ म्हणून आलेले डॉ. सोमेश वद्राबाडे यांनी विद्यार्थ्यांना उपकरण कसे तयार करायचे, उपकरण बद्दल संपूर्ण सखोल माहिती दिली व त्याचे मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना भौतिक उपकरण तयार करण्यामध्ये आवड निर्माण झाली व रुची वाढली, त्यांचा आत्मविश्वास व त्यांचे कला कौशल्य विद्यार्थ्यांना मोजमाप घेताना जे काही अडचण येत होत्या त्यात भविष्यात येणार नाहीत आणि विद्यार्थ्यांच्या या उत्साहाने व आत्मविश्वासाने संपूर्ण विद्यार्थी स्वयंस्पूर्तीने या कार्यशाळाला उपस्थित होते. सदर कार्यशाळेचा लाभ बुलढाणा जिल्ह्यामधील श्री पुंडलिक महाराज महाविद्यालयाचे विद्यार्थी, श्री शिवाजी विज्ञान कॉलेज मोताळा, जिजामाता महाविद्यालय बुलढाणा, श्री शिवाजी सायन्स कॉलेज चिखली, एमपी कोठारी नांदुरा रेल्वे, झांबड विज्ञान कॉलेज नांदुरा, जीएस खामगाव कॉलेजचे विद्यार्थ्यांनी, विज्ञान महाविद्यालय मलकापूर येथील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

# महासंस्कृती महोत्सवात महाराष्ट्राची लोकधारा गौरी थोरात यांची एकांकीका ठरली लक्षवेधी

जनसंचलन/बुलढाणा




पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग आणि जिल्हाधिकारी कार्यालयातर्फे चिखली येथे आयोजित महासंस्कृती महोत्सवाच्या शेवटच्या दिवशी ङ्महाराष्ट्राची लोकधाराफ आणि ङ्कराजमाता जिजाऊसाहेबफ एकांकिका सादर करण्यात आली. यात गौरी थोरात यांची एकांकिका लक्षवेधी ठरली. महासंस्कृती महोत्सवात शेवटच्या दिवशी गुरुवारी, दि. २२ फेब्रुवारी रोजी ङ्महाराष्ट्राची लोकधाराफ या महाराष्ट्राची संस्कृती दर्शविणारा कला आविष्कार अनिरुद्ध जोशी आणि सहकलाकार यांनी सादर केला. सुरवातीला अरुणोदय झाला ही भूपाळी सादर केली. ङ्महाराष्ट्राची लोकधाराफ मध्ये ओवी, वासुदेव आदी लोककला सादर करण्यात आल्या. अनिरुद्ध जोशी यांनी एका जनार्दनी, आम्ही ठाकर ठाकर, गोंधळ नाऊलीचा, खेळ मांडला आदी गीते सादर केली. गौरी थोरात यांनी ङ्कराजमाता जिजाऊसाहेबफ यांच्या जीवनावर आधारित एकांकिका सादर केली. राजमाता जिजाऊसाहेब यांच्या जीवनातील बालपण ते स्वराज्य स्थापनेपर्यंतचा प्रवास कथन केला. यात बालपण, शहाजीराजे यांच्याशी विवाह, आजोबांचा खून, छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म, त्यांचे बालपण, छत्रपतीच्या जीवनातील प्रसंग, राज्याभिषेक आदी प्रसंग जिवंत केले. आमदार श्वेता महाले यांनी सादरीकरणाचे कौतूक केले. सुरवातीला गजानन जाधव आणि समूहाने महाराष्ट्र गीत सादर केले. तसेच गाथा इतिहासाची हा पोवाडा सादर केला. यावेळी आमदार श्वेता महाले, जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे, निवासी उपजिल्हाधिकारी सदाशिव शेलार, उपजिल्हाधिकारी सुरेश थोरात, शरद पाटील आदी उपस्थित होते. कार्यक्रमस्थळी बचतगटांच्या स्टॉल्सच्या माध्यमातून खाद्य संस्कृतीचे आयोजन करण्यात आले होते. तसेच हस्तकला आणि पारंपरिक वस्त्रांचे दालन आणि पुस्तके विक्रीस ठेवण्यात आली होती.

# निवडणूक आयोगाची मोठी घोषणा, शरद पवार गटाला तुतारी चिन्ह बहाल...

वृत्तसंस्था/मुंबई

निवडणूक आयोगाने शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष - शरदचंद्र पवार या पक्षाला तुतारी हे नवं निवडणूक चिन्ह दिले आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात सातत्याने मोठ्या घडामोडी घडत आहेत. दरम्यान महाराष्ट्र विधानसभा आणि निवडणूक आयोगाने अजित पवार यांना राष्ट्रवादीचे खरे दावेदार म्हणून स्वीकारले होते. यानंतर अजित पवार विरुद्ध शरद पवार आणि सुप्रिया सुळे यांच्यातील शाब्दिक युद्ध तीव्र झाले. दरम्यान, आता शरद पवार यांच्या समर्थकांसाठी आनंदाची बातमी आली आहे. शरद पवार यांच्या पक्षाला आता नवे निवडणूक चिन्ह मिळाले आहे. या पक्षाचे नाव राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार म्हणजेच राष्ट्रवादी शरदचंद्र पवार असे असेल आणि निवडणूक चिन्ह तुतारी वाजवणारा माणूस आहे. शरद पवार यांच्या पक्षाला निवडणूक आयोगाकडून चिन्ह मिळाले आहे. नवीन निवडणूक चिन्हाचा संदर्भ देत पक्षाने सांगितले की, ही आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे. पक्षाच्या अधिकृत सोशल मीडिया अकाऊंटवर ही माहिती देण्यात आली आहे. तसंच चिन्ह मिळाल्यानंतर प्रतिक्रिया मांडली आहे. याबाबतची पोस्ट सोशल मीडियावर शेअर केली आहे.महाराष्ट्राच्या इतिहासात छत्रपती शिवरायांच्या शौर्यानं ज्या तुतारीने दिल्लीच्या तख्ताच्याही कानठळ्या बसवल्या होत्या, तीच तुतारी आज निवडणूक चिन्ह म्हणून निश्चित होणं ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष- शरदचंद्र पवारसाठी गौरवास्पद बाब आहे. महाराष्ट्राचं आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराज, फुले, शाहू, आंबेडकरांच्या पुरोगामी विचारांनी, आदरणीय खा. शरदचंद्र पवार साहेबांच्या साथीने दिल्लीच्या तख्ताला हादरवून सोडण्यासाठी हीच तुतारी पुन्हा एकदा रणशिंग फुंकण्याकरिता सज्ज आहेराष्ट्रवादी काँग्रेस पक्ष - शरदचंद्र पवार या पक्षाच्या सोशल मीडिया अकाऊंटवर अशी पोस्ट लिहित विरोधकांना आव्हानही केल्याचे दिसत आहे. दरम्यान यानंतर सर्व स्तरांतून यावर प्रतिक्रिया येत आहे. यावर जितेंद्र आव्हाडांनी ट्विट करत प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले की, हा महाराष्ट्राच्या जनतेच्या मनातील संकेत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) यांना निवडणूक आयोगाने निशाणी दिली अन् निशाणी काय दिली तर तुतारी! एका योद्धयाच्या हाती तुतारी दिली... या योद्धाचे नाव आहे, शरद पवार ! ८४ वर्षांचे शरद पवार, ते परत एकदा लढाईला उतरलेत. हा संकेत वेगळाच संदेश देऊन जातो. महाराष्ट्र युद्धासाठी तयार आहे. युद्ध अधर्माविरूद्ध आहे..अन् या युद्धाची तुतारी वाजवायचे काम निवडणूक आयोगानेच केलेय.

# खळबळजनक घटना अकोल्याच्या २६ युवकाची बुलढाण्यात गळफास घेउन आत्महत्या!

## त्रिशरण चौक स्मशानभूमी मागील दरीत झाडाला घेतला गळफास...!

जनसंचलन/बुलढाणा

बुलढाणा शहरातून धक्कादायक बातमी समोर आली आहे. त्रिशरण चौकातील हिंदू स्मशानभूमीच्या मागील जागेत झाडाला गळफास घेऊन एका युवकाने आज २२ फेब्रुवारीच्या दुपारी २ वाजेच्या सुमारास आत्महत्या केली. परिसरात बकऱ्या चारण्यासाठी येणाऱ्यांना हे धक्कादायक दृश्य दिसले. रमण आठवले (२६वर्ष) असे आत्महत्याग्रस्त युवकाचे नाव असून तो अकोला येथील रहिवासी आहे. गॅस सिलेंडरचा गाडी वर तो काम करायचा. बुलढाणा येथील खाजगी हॉस्पिटल मध्ये त्याचे जावई भरती असल्याचे समजते. त्यांना पाहण्यासाठी दुपारी १२ वाजता तो आपल्या आईसह आला होता. थोड्या वेळात येतो असे सांगून तो दवाखान्यातून बाहेर पडला अन् परत आलाच नाही. त्यांनतर त्यांने आत्महत्या केल्याचे दिसून आले.त्याने स्वतः ला का संपवलं? याचे कारण अस्पष्ट आहे. घटनास्थळी पोलिस दाखल झाले असून पंचनामा करत आहेत.मृतदेह हा झाडला लटकलेल्या अवस्थेत असतांना



त्याला खाली उतरविण्यासाठी सिटी केबलचे ऑपरेंटर विजय शेकोकार हे पुढे आले व त्यांनी आपले योगदान दिले.या युवकाने आत्महत्या का केली याचा तपास पोलिस करित आहे

# सुतार समाज बांधवांकडून प्रभू विश्वकर्मा पुरस्कार पत्रकार संतोष थोरहाते यांना प्रदान !

जनसंचलन/चिखली

गेल्या अनेक वर्षापासून ग्रामीण भागात विधायक व शोधपत्रकारीतेचा वसा घेत कार्य करणारे पत्रकारीतेच्या माध्यमातून समाजातील दुर्बल,वंचित घटकांच्या हक्क व न्यायासाठी पत्रकारीतेच्या माध्यमातून न्याय देण्याचे काम निर्भिड सारथीचे मुख्य संपादक श्री संतोष थोरहाते यांनी केले आहे. त्यांच्या विधायक पत्रकारीतेची दखल घेत चिखली तालुका विश्वकर्मा जयंती उत्सव समितीच्या वतीने चिखली येथील संत खटकेश्वर महाराज संस्थान येथे आयोजित प्रभू विश्वकर्मा जयंती उत्सव कार्यक्रमामध्ये उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पत्रकार संतोष थोरहाते यांना विश्वकर्मा पुरस्कार २०२४ प्रदान करण्यात आला. यावेळी चिखली येथील उद्योजक विजयकुमार मेहत्रे, जिल्हा उद्योग केंद्र बुलडाणाचे महाव्यवस्थापक सुनिलजी पाटील,राष्ट्रीवादी काँग्रस जिल्हा उपाध्यक्ष संजयजी गाडेकर,महाराष्ट्र राज्य ग्रामीण पत्रकार संघाचे अध्यक्ष पवनजी वानखेडे,पत्रकार सुधीरजी




चेके,जेष्ठ कामगार नेते सतिषजी शिंदे, श्रीराम वानखडे,अनंतराव राऊत,गजानन सुरूशे,गजानन जवरकर उत्सव समिती अध्यक्ष संतोष जगताप,उपाध्यक्ष बंडू कदम,सचिव राहूल इंगळे तथा आदि उपस्थित होते.

# सराईत मोबाइल चोरटा पोलिसांच्या जाळ्यात अडकला...



जनसंचलन/ खामगाव

मोबाइलवर बोलायचे आहे, असे म्हणून इतरांकडून घेतलेला मोबाइल पळवण्याचा सपाटा भाजीबाजारात एकाने लावला होता. याप्रकरणी २१ फेब्रुवारी रोजी दाखल तक्रारीनुसार पोलिसांनी सराईत मोबाईल चोरटा इस्माईलखान उस्मानखान ऊर्फ बाबा (राधेय) (वय ३२) याला बुधवारी अटक केली. भाजी मार्केट परिसरात भुरटा चोर इस्माईलखान उस्मानखान ऊर्फ बाबा (राधेय) हा मागील काही वर्षांपासून मोबाइल घेऊन पळून जात होता. यासाठी तो नेहमी फिरून सावज हेरत असे. भाजी विक्रेते किंवा ग्राहकांकडून आवश्यक बोलायचे आहे, असे म्हणून मोबाइल मागत असे. काहीजण त्याला मोबाइल देत असत. त्यांची नजर हटताच काही क्षणातच मोबाइल घेऊन तो पसार व्हायचा. भाजी मार्केटमध्ये याबाबतची माहिती अनेकांना होती. मात्र, कोणी त्याच्या विरोधात तक्रार करण्यास पुढे येत नव्हते. २१ फेब्रुवारी रोजी टिळक मैदानाकडे जाणाऱ्या रस्त्याच्या कडेला अभिषेक संजय हिवरखेडे (२३) हे भाजीपाला विकत होते. त्यावेळी आरोपी त्यांच्याजवळ आला. कॉल करावयाचा आहे, असे म्हणून त्यांच्याकडून मोबाइल (किं. अं. ४ हजार रुपये) घेतला. त्यांची नजर हटताच आरोपीने मोबाइलसह पोबारा केला. याप्रकरणी हिवरखेडे यांनी शहर ठाण्यात तक्रार दिली. पोलिसांनी अनोळखी व्यक्तीविरुद्ध भादंवि कलम ४०६ नुसार गुन्हा दाखल केला. पोलिसांनी त्या अनोळखीबाबतची माहिती परिसरातील नागरिकांकडून घेतली. त्यामध्ये तो टिळक मैदान भागातील रहिवासी इस्माईलखान उस्मानखान ऊर्फ बाबा (राधेय) असल्याचे समोर आले. यानंतर त्याचा शाळा क्रमांक १, शाळा क्रमांक- २ तसेच बाबा भेटण्याची शक्यता असलेल्या जागांवर पोलिस गेले. तो टिळक मैदान परिसरात आल्याची माहिती मिळताच डीबी पथकाने त्याला ताब्यात घेत अटक केली आहे. तपासात आणखी काही मोबाइल चोरीची प्रकरणे उघडकीस येण्याची शक्यता आहे. पुढील तपास एएसआय दीपक इलामे करीत आहेत.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958